**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram : UNIWOMEN
Website : sndt.ac.in

आस्था/जन-१५/२०२२-२३/ 1647 दिनांक:-२८ ऑक्टोबर, २०२२

## परिपत्रक

प्रति,
सर्व विनाअनुदानित संचालक/विभाग प्रमुख/प्राचार्य/समन्वयक/प्रभारी,
विद्यापीठ संचलित सर्व महाविद्यालय/विभाग/संस्था,
श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ,
चर्चगेट व जुहू व पुणे आवार.

विषय:- विद्यापीठाच्या विनाअनुदानित पदावर कायम स्वरुपी कार्यरत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याबाबत.

संदर्भ:-(१) शासनाचे दिनांक ०८ डिसेंबर, २०२० रोजीची अधिसूचना.
(२) व्यवस्थापन परिषदेचा दिनांक ३० जुलै, २०२२ रोजीचा ठराव.
(३) व्यवस्थापन परिषदेने, सातव्या वेतन आयोगासंदर्भात गठीत समितीची दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ रोजीची ऑनलाईन बैठक.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भाधिन अधिसूचनेन्वये, महाराष्ट्र शासनाने राज्यातील अकृषी विद्यापीठांमध्ये कार्य करणाऱ्या शिक्षकेतर अधिकारी/कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाचा लाभ दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२० पासून अनुज्ञेय केला आहे. त्यास अनुसरुन विद्यापीठाच्या विनाअनुदानित पदावर दि. ३१/१२/२०१४ पुर्वी कायम स्वरुपी कार्यरत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोग लागू करणे विद्यापीठ प्रशासनाच्या विचाराधीन होते.

विद्यापीठातील विना-अनुदातिन पदावर कायम स्वरुपी कार्यरत असलेल्या शिक्षकेतर कर्मचारी यांना ७ वा वेतन आयोग खालील अटी व शर्तीस अनुसरुन अनुज्ञेय करण्यात येत आहे:-

१. कायम स्वरुपी शिक्षकेतर कर्मचारी यांना शासन निर्णय दिनांक ०८ डिसेंबर, २०२० मधील तरतूद केल्याप्रमाणे ७ वा वेतन आयोग लागू करण्यात यावे. त्यामध्ये दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून काल्पनिक वेतनवाढ देण्यात यावी असे नमूद केलेले आहे. दिनांक ०१ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० या कालावधीची थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही.
२. दिनांक ०१/०१/२०१६ पासून काल्पनिक वेतनवाढीसह, ७ वा वेतन आयोगानुसार, दिनांक ०१ सप्टेंबर, २०२२ पासून प्रत्यक्ष लाभ अनुज्ञेय करावे.
३. व्यवस्थापन परिषदेमध्ये ठराव पारित केल्याप्रमाणे विना अनुदातिन तत्वावर कायम स्वरुपी कार्यरत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दि. ०१/०१/२०१६ ते ३१ ऑगस्ट २०२२ या कालावधीची थकबाकी, सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना सुधारीत सेवानिवृत्ती वेतन इत्यादी अनुज्ञेय लाभासाठी समिती गठीत केली आहे. गठीत समितीच्या अहवालानंतर सदर बाबतचे स्वतंत्र परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.
४. शिक्षकीय कर्मचारी यांच्या ७ वा वेतन आयोग लागू करण्या संदर्भात उत्पन्न व खर्च याचा ताळेबंद समितीसमोर सादर केल्यानंतर वेतन आयोग लागू करण्याबाबतीत विचार करण्यात येईल.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

F:\Unaided.docx